संदर्भ:- दै.लोकमत,जाहिरात दि.१३.१०.२०२३

क्रमांक: विचौअ-१६२३/प्र.क्र.५५/११-अ
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२३.

## सेवानिवृत्त अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, **अमरावती** कार्यालयातील प्रलंबित चौकशीची प्रकरणे कालमर्यादेत पूर्ण करण्याकरीता, प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांना कार्यालयीन कामकाजात मदत करण्यासाठी मदतनीस म्हणून, गट-अ मधून सेवानिवृत्त झालेल्या व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांत चौकशी अधिकारी म्हणून कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असलेल्या एका राज्य शासकीय अधिकाऱ्याची शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदींनुसार सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

- इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी दि. ३१ ऑक्टोबर, २०२३ अखेरपर्यंत खालील विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.
- मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार सक्षम प्राधिकारी यांचा राहील.
- जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वर ६३ पेक्षा अधिक नसावे.
- करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयात काम करावे लागेल.
- कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.
- इतर अटी व शर्ती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधे नमूद केल्याप्रमाणे राहतील.
- नियुक्तीच्या कालावधीकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३, दि.०८.०९.२०२३ मधील तरतुदींनुसार पारिश्रमिक अदा करण्यात येईल.
- सहा महिन्यांत केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येऊन आवश्यकता भासल्यास नियुक्तीचा कालावधी वाढविण्याबाबत विचार केला जाईल.
- इच्छुक अधिकाऱ्यांनी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांच्या नावे desk11a-gad@mah.gov.in या मेल आयडी वर अर्ज करावा.
- अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३१२१/ ०२२-२२७९३८९५ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा.

अर्जाचा विहित नमुना :-

| | | |
|---|---|---|
| १. | नाव | |
| २. | सेवानिवृत्तीनंतरचा निवासी पत्ता | |
| ३. | संपर्क क्र. | |
| ४. | ई-मेल आय.डी. | |
| ५. | जन्म दिनांक | |
| ६. | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ७. | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ८. | सेवानिवृत्तीच्या वेळेची वेतनश्रेणी | |
| ९. | सेवानिवृत्तीच्या दिनांकास मंजूर मूळ निवृत्तीवेतन रु. | |
| १०. | ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो प्रशासकीय विभाग व कार्यालयाचे नाव | |
| ११. | चौकशी अधिकारी म्हणून काम केलेला महसुली विभाग | |
| १२. | चौकशी अधिकारी म्हणून केलेल्या कामाचा कालावधी/तपशील<br>१) प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी म्हणून<br>२) गट-अ/गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी म्हणून *<br>३) गट-क/गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या चौकशीसाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी म्हणून * | |
| १३. | विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण सुरु आहे का, असल्यास तपशील द्यावा. | |
| १४. | विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणात शिक्षा झाली आहे का, असल्यास तपशील द्यावा. | |

* कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी म्हणून नियुक्तीच्या कालावधीत वेगवेगळया प्रशासकीय विभागांनी/कार्यालयांनी चौकशी अधिकारी म्हणून दिलेले नियुक्तीचे आदेश सोबत जोडावेत व त्यांतील कोणत्या प्रकरणांत चौकशी अहवाल सादर केले, त्याचा तपशील द्यावा.

( ज.अ.विसपुते )
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

Scanning Copy